ISSN: 2249-894X

**REVIEW OF RESEARCH**

UGC APPROVED

International Online Multidisciplinary Journal

**Volume - 8 | Issue - 3 | December - 2018**

**Impact Factor : 5.7631(UIF)**

# संत तुकारामांच्या अभंगातील प्रतिकात्मकता





**प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे**

मराठी विभागप्रमुख , श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय, मौदा, जि. नागपूर.

प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे

प्रस्तावना : संत तुकारामांचे जीवनानुभव त्यांच्या अभंगातून व्यक्त झाले आहेत. त्यामुळे ते आपल्या अभंगातून अनेक स्वगते बोलतात. या सर्व स्वगतांचे एकत्रित रूप .........

Page No :-3

**Editor - In - Chief - Ashok Yakkaldevi**

Scanned with OKEN Scanner

**International Online Multidisciplinary Journal**
**REVIEW OF RESEARCH**
**ISSN NO: 2249-894X**

Review of Research (ROR) Journal is an Online International Multidisciplinary Research Journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the Editorial Board. Readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## OUR CHIEF EDITORS

India



Ashok Yakkaldevi

Iran



Bijan Goodarzi

Bucharest



Ecaterina

Sri-lanka



Perera

## Associate Editors



Dr. T. Manichander




Sanjeev Kumar Mishra

## Associated and Indexed, India

- MENDALEY
- GOOGLE SCHOLAR
- CITULIKE
- ENDNOTE
- ZOTERO
- DRJI

Scanned with OKEN Scanner




ISSN NO:- 2249-894X Impact Factor : 5.7631(UIF) Vol.- 8, Issue - 3, December-2018

## Content



| Sr. No. | Title and Name of The Author (S) | Page No. |
|---|---|---|
| 1 | भारतीय समाज में स्वामी रामतीर्थ के दर्शन का योगदान<br>रहितेश्वर राय | 1 |
| 2 | संत तुकारामांच्या अभंगातील प्रतिकात्मकता<br>प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे | 3 |
| 3 | Job Satisfaction Among Social Workers: A Study In Vijayapura And Raichur District<br>Gnanasundari and Prof. S.A.Kazi | 7 |
| 4 | A Comparative Study On Attitudes Of Social Science Teachers Of Koppal District Towards Programmed Instructions<br>Ratan Chavan | 13 |
| 5 | Impact Of Socio Economic Status On The Aggression Among Sports Players<br>Mr. Shankrappa and Dr. Rajkumar P. Malipatil | 21 |
| 6 | Politics Of Regionalism In Himachal Pradesh: An Outcome Of Spatio-Political Organisation And Voting Cleavages<br>Dr. Ramesh Chand | 25 |
| 7 | A Study On Women Entrepreneurs Problems In India And Government Policies<br>Mrs.Tentu Suguna and Dr. Gandreti Venkata Rama Krishna Rao | 33 |
| 8 | Digital India Programme: A Lubricant For Growth In Indian Economy<br>Ravi Kumar, Dr. P. V. Khatri and Pravesh Kumar Mann | 37 |
| 9 | Suggestopedia: A Friendly Approach To The Inclusive Classroom<br>M. Pradheeba , B. William Dharma Raja and S. R. Sundaravalli | 45 |



Scanned with OKEN Scanner

International Online Multidisciplinary Journal

**Review of Research Journal**

ISSN: 2249-894X     5.7631(UIF)

Volume - 8 | Issue - 3 | December - 2018

# संत तुकारामांच्या अभंगातील प्रतिकात्मकता



प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे

मराठी विभागप्रमुख , श्रीमती राजकमल बा. तिडके
महाविद्यालय,मौदा. जि. नागपूर

Scanned with OKEN Scanner

REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X
VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

# संत तुकारामांच्या अभंगातील प्रतिकात्मकता




प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे
मराठी विभागप्रमुख , श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय,
मौदा, जि. नागपूर.

## प्रस्तावना

संत तुकारामांचे जीवनानुभव त्यांच्या अभंगातून व्यक्त झाले आहेत. त्यामुळे ते आपल्या अभंगातून अनेक स्वगते बोलतात. या सर्व स्वगतांचे एकत्रित रूप म्हणजे त्यांची गाथा होय. गाथा हे एक महास्वगत आहे. विंदा करंदीकर म्हणतात, 'भरलेल्या भीमेकडून । तुकोबांची माळ घ्यावी' म्हणजे जीवन ही भीमा असून तिच्यात तुकोबांचे अभंगमणी विखुरलेले आहेत. आपण ते मणी गोळा करून त्यांची माळ गुंफायची असते. यामुळेच प्रतीकात्मकता हा तुकोबांच्या अभंगांचा अविभाज्य शैलीविशेष बनलेला आहे. या प्रतीकांमुळेच आधुनिक काळातही अभंगवाणी जीवनाला व्यापणारी चिरंतन स्वरूपाची बनलेली आहे.

## राजकीय स्वरूपाची प्रतीकात्मकता :

बाईल चालली माहेरा । संगे दिधला म्हातारा ।।१।।
सिधा सामग्री पोटाची । सवे स्वारी बइलाची ।।धृ।।
जाता पाडिली ढोराने । शिव्या देती अन्योविन्ये ।।२।।
न सावरी आपणाते । नग्न सावले वरते ।।३।।
फजित केले जनलोकी । मेला म्हणे पडे नरकी ।।४।।
गोहाची हे गेली लाज । गांजिता का तुम्ही मज ।।५।।
तुका म्हणे जनी । छीः थू केली विटंबणी ।।६।।

संत तुकारामाची अभंगगाथा (अ. क्र. ४४७७)१

"बायको माहेरी जायला निघाली. तिचे रक्षण करण्यासाठी सोबत एका म्हाताऱ्याला दिले. तिने जेवणासाठीची सर्व शिधा सामग्री घेतली. त्यांच्यासोबत एक बैलही होता. रस्त्याने जाता तिला बैलाने पाडले. तिला तोल सावरता आला नाही. तिने वाटेल तशा शिव्या दिल्या. तिचे लुगडे वर गेले होते व त्यामुळे ती नग्न झाली होती. ती चिडली आणि त्या म्हाताऱ्याला म्हणाली की, तुम्ही साऱ्या लोकांमध्ये माझी फजिती केली. तुम्ही नरकात पडाल. माझी लाज गेली, मला तुम्ही असे का गांजता? तुकोबा म्हणतात की साऱ्या लोकात तिची विटंबना झाली. "

या संपूर्ण अभंगातील प्रतीकात्मकता अगदी स्पष्ट आहे बाईल माहेरी निघाली म्हणजे जनतेला सुखासमाधानाचे जीवन हवे आहे आणि म्हणून तिला जायचे. बैल म्हणजे गावगुंड होत. ते जनतेची बेइज्जत करीत असतात. असे होऊ नये म्हणून शासनाने अधिकारी नेमले आहेत. म्हातारा म्हणजे हे पोलीस व अन्य अधिकारी होत. पण ते तिचे रक्षण करायला असमर्थ आहेत कारण ते म्हातारे आहेत म्हणजे ते अक्षम, दुर्बल ठरले आहेत. याचा अर्थ असा की, "रक्षक कोणत्याही क्षेत्रातला असो, तो अकार्यक्षम म्हातारा नको. हे तत्त्व आधुनिक काळातही लागू पडणारे आहे."२

अशीच राजकीय प्रतीकात्मकता 'अधमासी तो अधम', 'आपुलिया वळे मी नाही बोलत' इ. अभंगांतून आलेली आहे.



Scanned with OKEN Scanner

## वैयक्तिक जीवन संदर्भातील प्रतीकात्मकता :

संत तुकारामांच्या अभंगातील प्रतीकात्मकता लक्षात न घेता केवळ त्यांचा वाच्यार्थ लक्षात घेऊन काही लोक त्या अभंगाचा चुकीचा व विपरीत अर्थ लावतात. 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' या अभंगाचे असेच झाले आहे. एखाद्या रुग्णाची तब्बेत जरा अधिकच बिघडली की लगेच 'आपुले मरण पाहिले म्या डोळा' असे म्हणतो आणि ते सर्वस्वी चूक असते. कारण तुकाराम म्हणतात की मृत्यूचा हा सोहळा असतो व तो अनुपम असतो. लौकिक मरणाचा सोहळा होत नसतो.

आपले मरण पाहिले म्या डोळा । तो जाहला सोहळा अनुपम्य ।।१।।
आनंदे दाटली तिन्ही त्रिभुवने । सर्वात्मकारणे भोग जाला ।।धृ।।
एकदेशी होतो अहंकारे आथिला । त्याच्या त्यागे झाला सुकाळ हा ।।२।।
फिटले सुतक जन्म मरणाचे । मी माझ्या संकोचे दुरी जालो ।।३।।
नारायणे दिला वस्तीस ठाव । ठेवूनिया भाव ठेलो पायी ।।४।।
तुका म्हणे दिले उमटुनि जगी । घेतले ते अंगी लावुनिया ।।५।।

येथे 'मी' म्हणजे 'अहंकार'. अहंकार मेला तो सोहळा अनुपम्य होता. आता हा आनंद त्रिभुवनात मावत नाही. वैयक्तिक अहंकारामुळे मी संकुचित होतो, अहंकाराच्या त्यागाने मी विश्वात्मक झालो. यामुळेच जन्ममरणाची संवेदना, सुखदुःखे नाहीशी झाली. देवाने पायाशी जागा दिली. 'मी' त्याच्या पायावर निष्ठा वाहिली.

मी म्हणजे अहंकार ही यातली प्रतीकात्मकता आहे. 'हे माझे आहे, हे मी केले, हे कर्तृत्व माझे आहे' असे आपण नेहमी बोलत असतो. या अहंकारी वृत्तीमुळे घरात भांडणे होतात आणि समाजात वशिलेबाजी व भ्रष्ट्राचार निर्माण होतात. न्याय–अन्यायाची चाड राहत नाही आणि देशादेशातही यामुळेच लढाया होतात. अहंकार अनेक अनार्थाचे कारण असते. ''आपुले मरण पाहिले म्या डोळा। तो जाला सोहळा अनुपम्य' अशा रितीने तुकाराम एकदम परमात्म्याशी एकरूप होऊन आत्मविसर्जनही करतात.''3

'सत्य असत्यासी मन केले ग्वाही। मानियले नाही बहुमता।।'' यालाच गांधीजी आतला आवाज म्हणतात. 'कासया गुणदोष पाहू आणिकाचे । मज काय त्याचे उणे असे।। किंवा 'रात्रंदिवस आम्हा युद्धाचा प्रसंग' हे अनुभव तर आजही येत असतात. जसे बोलणे तसे वागणे हे तत्व गंगेच्या प्रतीकातून सांगताना तुकोबा म्हणतात, 'गंगाजळा पा। पाठी पोटी नाही।।' संकटाचे स्वागत करा कारण 'साहोनिया टाकी घाये। पाषाण देवचि झाला पाहे।।' तुमच्या गुणांची जाहिरात करण्याचे कारण नाही. 'न लगे चंदना सांगावा परिमळ । वनस्पती मेळ हाकारूनी।।' 'शद्ध बिजापोटी । फळे रसाळ गोमटी ।।' आपण माणूस म्हणुन जन्माला आलो आहोत. थोडा तरी उपकार करावा. नका घालू दूध जयामध्ये सार। ताकाचे उपकार तरी करा।। मुंगी आणि साखर यांचे प्रतीके घेऊन तुकोबा म्हणतात, 'लहानपण देगा देवा। मुंगी साखरेचा रवा।' आजकाल प्रियकर प्रेयसी 'आय लव्ह यू' अशा शब्दात प्रेम व्यक्त करतात. वास्तविक प्रेम निखळ असते. खरे प्रेम करणाऱ्या राधेने कृष्णाला असे कधीच म्हटले नाही. कारण, 'प्रेम नये सांगता, बोलिता, दाविता। अनुभव चित्ता चित्त जाणे।' कोणत्याही काळात तुमची योग्यता अबाधित राहावी हे हिऱ्याच्या प्रतीकातून सांगताना तुकोबा म्हणतात, 'हिरा ठेविता काळे गहाण । मोल न तुटे दुकाळी जाण।।' खरी योग्यता नसेल तर 'आदित्याची झाडे । काय त्यांचा उजेड पडे।।' अशी गत होईल.

## राष्ट्रीय व सामाजिक प्रतीकात्मकता :

'विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म। भेदाभेद भ्रम अमंगळ ।।१।।
आईका जी तुम्ही भक्त भागवत । कराल ते हित सत्य करा ।।धृ।।
कोणाही जिवाचा न घडो मत्सर । वर्ग सर्वेश्वर पूजनाचे ।।२।।
तुका म्हणे एका देहाचे अवयव । सुख दुःख जीव भोग पावे ।।३।।'

हे सर्व जग विष्णुमय आहे, याची जाणीव ठेवणे हाच वैष्णवांचा धर्म आहे. भेदाभेद हा अमंगळ भ्रम आहे. तुम्ही भागवत ऐका आणि जे सत्य व हिताचे तेच करा. कोणाचाही मत्सर करू नका. कारण तेच खरे परमेश्वर

 VOLUME - 8 | ISSUE - 3 | DECEMBER - 2018

पूजनाचे वर्म होय. ज्ञानेंद्रिये असोत की कर्मेद्रिये, ती सर्व इंद्रिये एकाच देहाची असतात, ते एकाच देहाचे अवयव असतात. त्यांचे सुख, दुःख जीवाला भोगावे लागते.

भेदाभेद करणे हा भ्रम होय आणि हा भ्रम अकल्याण करणारा अमंगळ आहे असे तुकोबा या अभंगातून स्पष्ट सांगतात. प्रतीकरूपाने यात राष्ट्रीय एकात्मतेचे सूत्र गोवले आहे. राष्ट्राच्या एका अवयवाला, एका घटकाला जे सुख दुःख होते ते सर्व राष्ट्राला भोगावे लागते. म्हणूनच भारताच्या एका विशिष्ट प्रदेशातल्या मुलाला जागतिक क्रीडा स्पर्धेत एखादे पदक मिळाले की केवळ त्या प्रदेशालाच नव्हे तर संपूर्ण भारताला आनंद होतो आणि केरळमध्ये महापूर आला तरी संपूर्ण भारताला दुःख होऊन इतर सर्व प्रदेश केरळला मदतीचा हात देतात. एका अवयवाला झालेले दुःख संपूर्ण देहाला भोगावे लागते. तुकोबांच्या काळात स्पृश्यास्पृश्य हा भेदभाव शिगेला पोचला होता. तो नष्ट झालाच पाहिजे असे तुकोबांना वाटत होते. या संदर्भात डॉ. कोमल ठाकरे आपल्या 'सामाजिक समतेचे पुरस्कर्ते : संत तुकाराम' या लेखात लिहितात, ''हे जग विष्णुमय असून तेथे भेदभाव करणे हा अमंगळ भ्रम आहे आणि असे मानणे हाच वैष्णवाचा धर्म होय. कोणाही जीवाचा मत्सर न करणे हे सर्वेश्वर पूजनाचे रहस्य आहे. विठ्ठलाच्या ठिकाणी भेदभाव नाही. त्याला सगळे भक्त सारखे असतात. तो भक्ताची जन्मजात पाहत नाही तर त्याच्याठिकाणी असलेला शुद्ध भाव महत्त्वाचा मानतो. या तुकारामांच्या भक्तिमार्गातूनच त्यांचा भूतदयावाद सहज व स्वाभाविकपणे जन्माला येतो.''४

'लोभचे मांजर' या प्रतीकातून तुकोबा सांगतात की, कीर्तनकार केवळ दक्षिणेच्या लोभाने कीर्तन करतात. म्हणून वक्ता व श्रोता दोघेही रितेच राहतात. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे' या शब्दात जणू वनीकरणाची हाक दिली आहे.' तोवरी तोवरी जंबूक करी गर्जना। जोवरि जोवरि सिंहगर्जना ऐकली नाही' हे उथळ ज्ञानी लोकांचे प्रतीक आहे. ध्येयनिष्ठ माणूस राजकारणात कसा भ्रष्ट होत जातो हे 'ढेकणाच्या संगे हिरा जो भंगला' या प्रतीकातून स्पष्ट होते. 'मुलाम्याचे नाणे। तुका म्हणे नव्हे सोने।।'' 'जाली गाढवी दुधाळ । महिमा गाईचा पावेल?' 'आवडे सकळा मिष्टान्न । रोग्या ते विषसमान' अशा कितीतरी अभंगातून सामाजिकता प्रतीकांमधून व्यक्त झाली आहे.

**तात्त्विक स्वरूपाची प्रतीकात्मकता :**

जेथे जातो तेथे तू माझा सांगाती । चालविसी हाती धरूनियां ।।१।।
चालो वाटे आम्ही तुझाचि आधार । चालविसी भार सवें माझा ।।धृ।।
बोलो जाता बरळ करिसी ते नीट । नेली लाज धीट केलो देवा ।।२।।
अवघे जन मज जाले लोकपाळ । सोइरे सकळ प्राणसखे ।।३।।
तुका म्हणे आता खेळतो कौतुकें । जाले तुझे सुख अंतर्बाहीं ।।४।।

''मी जेथे जेथे जातो तेथे तेथे तू माझ्यासोबत असतोस. मला तू माझा हात धरून चालवतोस. तूच माझा आधार आहेस. माझा सर्वभर तूच वाहतोस. मी बाळ आहे म्हणून काहीही बरळत सुटतो, पण तू मला सावरून घेतोस. म्हणून मी निर्भय झालो आहे आणि माझ्या बदलण्यालाही कवित्व आले आहे. आता तुझ्यामुळे सारे लोक माझे सोयरे व प्राणप्रिय मित्र झाले आहेत. तुझ्यामुळेच अंतर्बाह्य सुखात लोळण्याचे भाग्य माझ्या वाट्याला आले आहे.

'जेथे जातो तेथे तू माझा सांगाती' या ओळीतील 'तू' हा शब्द प्रतीकात्मक आहे. आई लहानषा बाळाला सांभाळते तेव्हा तो काय करतो आहे, जेवला की नाही, त्याची झोप आली आहे काय, त्याला काय हवे आहे, काय नको आहे हे पाहण्यासाठी आई सतत त्याच्या सोबतीला असते. त्याला सू लागली तरी तो आईचा पदर धरतो आणि विजेचा कडकडाट झाला तरी आईच्या पदराखाली लपतो. तो आईमुळे मोठा होत असतो. तुकाराम नामदेवादी सर्व संत संतत्त्वाच्या थोर पदाला पोचले कारण ते जेथे जातील तेथे विठ्ठल त्यांच्या सोबतीला होता. त्यांना केवळ विठ्ठलाचाच ध्यास लागला होता. ध्येयवादी माणसाचे असेच असते. त्यांना आपल्या ध्येयाचा चोवीस तास ध्यास लागलेला असतो. जोतीबा फुले जेथे जातील तेथे आपल्या शेतकरी–उन्नतीच्या स्त्री–शिक्षणाच्या व अस्पृश्यता निवारणाच्या ध्येयाने प्रेरित असत म्हणून ते महात्मा बनले. तुरुंगात जाऊनही बाळ गंगाधर टिळकांनी आपले ध्येय सोडले नाही, त्यांचे ध्येय त्यांच्या सांगातीच होते. म्हणून तुरुंगातही त्यांनी 'गीता रहस्य लिहिले. ते लोकमान्य बनले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेथे जातील तेथे दलितांना न्याय मिळवून देणे हे त्यांच्या सोबत होते.



Scanned with OKEN Scanner

म्हणून ते 'भारतरत्न' झाले. म्हणजेच 'तू' हे प्रतीक आईचे असो, देवाचे असो किंवा जीवन ध्येयाचे असो, 'जेथे जातो तेथे' हा 'तू' जर आपल्या सांगाती असेल तर आणि तरच माणूस थोर बनू शकतो, हे या प्रतीकातून स्पष्ट होते.

हेचि थोर भक्ती आवडते देवा । संकल्पावी माया संसाराची ।।१।।
ठेविले अनंते तैसेचि रहावे । चित्ती असो द्यावे समाधान ।।धृ।।
वाहिल्या उद्वेग दुःखचि केवळ । भोगणे ते फळ संचिताचे ।।२।।
तुका म्हणे घालू तयावरी भार । वाहू हा संसार देवा पायी ।।३।।

'अनंत' हे प्रतीक ज्याला अंत नाही ईश्वराचे जसे आहे तसेच ते आमच्या अनंत ध्येयासक्तीचे, अनंत आशांचे आणि अनंत इच्छांचेही प्रतीक आहे. पण आक्षेपक अनंत म्हणजे परमेश्वर एवढा एकच अर्थ लक्षात घेतात आणि या अभंगावर दैववादाचा आरोप करतात. हा त्यांचा आक्षेप वस्तुस्थितीस धरून नाही कारण वास्तविक हा अभंग पूर्णतया प्रयत्नवादाचा पुरस्कार करणारा आहे.

मानवी इच्छा अनंत असल्यामुळे त्या सर्वच पूर्ण होत नाहीत. मनाजोगे घडून येत नाही. त्यामुळे अनंतातून जेवढे आपल्या हाती आले तेवढ्यावर समाधान मानले तरच जीवन आनंदाने जगण्याची ऊर्जा मिळू शकते. न्यायमूर्ती म.गो. रानडे यांनीही या अभंगाचा हाच अर्थ लावला आहे. जीवनातील वैराग्य व उद्वेग यावर मात कशी करावी, याचे आशावादी सूत्र या प्रतीकातून व्यक्त झाले आहे.

संत तुकारामानी आपल्या अभंगातून वेदांत जनसामान्यापर्यंत पोहचविण्याचे कार्य केले. त्यांच्या अभंगातून भक्ती जशी ओथंबून वाहतांना दिसते तसेच समाजातील विषमतेवर त्यांनी घाव घातले आहेत. त्यांनी समाजातील अंधश्रध्देवर प्रहार केले आहेत.

जे कां रंजले गांजले। त्यांसी म्हणे जो आपुले।।
तोचि साधू ओळखावा। देव तेथेचि जाणावा।।

याप्रमाणे ख–या संताची ओळख करू देवून महाराष्ट्राला सुजान केले.

**संदर्भ टिपा :**


१. पुरुषोत्तम मंगेश लाड (संपा.) श्री. तुकारामबाबांच्या अभंगाची गाथा ; शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय मुंबई, द्वितीय आवृत्ती पुनमुद्रण १९७३ (पृ. क्र. ७३१)
२. डॉ. मनोहर रोकडे– संत तुकाराम : अभंगवाणी ; स्नेहवर्धन प्रकाशन पुणे– २०१३ (पृ. क्र. १०)
३. डॉ. किशोर सानप, प्रा. मनोज तायडे – तुकाराम व्यक्ति आणि कवित्व ; लोकवाड्.मय गृह, मुंबई दुसरी आवृत्ती १९९६ (पृ. क्र. ४९)
४. डॉ. शरयू तायवाडे, डॉ. राजेंद्र वाटाणे, डॉ. कोमल ठाकरे (संपा.) –युग प्रवर्तक संत : तुकाराम रामदास –विजय प्रकाशन, नागपूर–२०१० (पृ. क्र. ८३)



**प्रा. डॉ. व्यंकटेश पोटफोडे**
**मराठी विभागप्रमुख , श्रीमती राजकमल बा. तिडके महाविद्यालय, मौदा, जि. नागपूर.**



Scanned with OKEN Scanner




Scanned with OKEN Scanner